CMYK

बीड । शनिवार
०१.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३२२
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१

# शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी
# अजित पवारांचा पुढाकार



**बारामती । प्रतिनिधी**

राज्यातील प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात प्राथमिक शिक्षक संघासोबत घेतलेल्या बैठकीत दिल्याची माहिती शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांनी दिली.

राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या नूतन कार्यकारणीचे स्वागत व प्राथमिक शिक्षकांच्या प्रश्नाबाबत आढावा घेण्यासाठी मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयातील समिती कक्षात ही बैठक संपन्न झाली. यावेळी शिक्षक नेते संभाजीराव थोरात यांच्यासह राज्यसंघाचे पदाधिकारी उपस्थित होते. प्राथमिक शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत यावेळी चर्चा करण्यात आली, प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित बिलांसाठी निधी उपलब्ध करून देणे, सर्व शिक्षक कांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, एम एस सी आय टी परीक्षेस मुदतवाढ देण्यात यावी व वेतनातील वसुल केलेली रक्कम परत मिळावी.

मुख्यालयी राहण्याची अट शिथिल करण्यात यावी, शिक्षण सेवकांना नियमित वेतन देण्यात यावे, मुख्याध्यापक पदवीधर केंद्रप्रमुख पदांची पदोन्नती तात्काळ करण्यात यावी अ, ब, क, ड वर्ग नगरपालिका व वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षकांचे संपूर्ण वेतन शासनाकडून व्हावे यांसह इतरही मागण्या शासनाकडे करण्यात आल्याची माहिती, शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांनी दिली. २०१६ नंतर वरिष्ठ वेतनश्रेणी मिळालेल्या शिक्षकांची वेतन त्रूटी दूर करण्यासाठी खुल्लर समितीचा अहवाल तपासावा मात्र शिक्षकांची वेतन त्रुटी दूर होण्यासाठी २ वेतनवाढी मंजूर करण्याचा अंतिम निर्णय शासनाने घ्यावा अशी शिक्षक संघाची मागणी आहे.

### सचिवस्तरावर बैठकीचे आयोजन....

**शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांचे अर्थ, ग्रामविकास, शिक्षण, नगर विकास व आरोग्य या विभागांमध्ये वर्गीकरण करून पुढील महिन्यात तातडीने सर्व विभागांच्या प्रधान सचिवांची बैठक आयोजित करण्याच्या सूचना अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री कार्यालयास दिल्या आहेत.**

# 'अण्णा बोलते अन पोलीस काम को लग जोती'

## तुरुंगात कराडला VIP सेवा; धक्कादायक माहिती समोर



**बीड । प्रतिनिधी**

पवनचक्की कंपनीला खंडणी मागणे आणि सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मिक कराडला तुरूंगात 'व्हीआयपी' सेवा मिळत असल्याची माहिती समोर आली आहे. पोलीसच कराडला सगळी साधने पुरवत आहे.

याची पोलिसांकडून चौकशी करण्यात येणार असल्याचे कळते. तुरूंगात कराडला कुणी, कधी, कशी 'व्हीआयपी' सेवा पुरवली याची कुंडलीच हाती लागली आहे. एका मराठी वृत्तवाहिनीने हे वृत्त दिले आहे. वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे. बीड जिल्ह्यात एकप्रकारे कराडचा 'होल्ड' असायचा. त्यामुळे कराडविरोधात कोणताही गुन्हा दाखल करण्यापूर्वी पोलीस सुद्धा विचार करत असे. खंडणी प्रकरणात कराडविरोधात गुन्हा दाखल करण्यास सुद्धा उशीर झाला. पण, संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात वाल्मिक कराडचे नाव आले


▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये ड्युटी नको रे बाबा!

## अजितदादा पालकमंत्री असलेल्या बीडच्या पोलिस दलातील १0७ अधिकाऱ्यांचे बदलीसाठी विनंती अर्ज

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीडमधील काही अधिकारी आणि पोलिसांचे कारनामे समोर येऊ लागले. गुन्हेगारांशी संबंध ते त्यांच्या काळ्या धंद्यांमध्ये भागिदारी असे अनेक प्रकार उघडकीस येताना दिसत आहेत. अशातच आता बीड पोलिस दलात एक खळबळ माजवणारी बातमी समोर आली आहे. बीड जिल्ह्यात ड्युटी नको रे बाबा असे म्हणत १०७ पोलिस अधिकाऱ्यांनी बदलीसाठी विनंती अर्ज केल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात नेमकं असं काय घडतंय ज्यामुळे




पोलिस अधिकारी या ठिकाणी ड्युटी करण्यास अनुत्सुक आहेत असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार पालकमंत्री असलेल्यां बीड जिल्ह्यात का नको? या अगोदर अनेक अधिकाऱ्यांची बीड जिल्ह्यासाठी पसंती होती. मात्र अचानक एवढ्या मोठ्या प्रमाणात बदलीसाठी विनंती अर्ज आल्याने त्याची चर्चा होत आहे. अजितदादा यांनी पालकमंत्रीपदाची धुरा हाती घेतल्यानंतर चुकीची गोष्ट खपवून घेतली जाणार नाही असा सज्जड दम दिला आहे. त्यामुळे पोलिस दलातील काही अधिकारी आणि शिपायांमध्ये चलबिचल सुरू झाल्याचं दिसतंय.

### संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड का नको?

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड पोलिसांची प्रतिमा बदलल्याच

▶▶ उर्वरित पान २ वर

## मोरेवाडी साठवण तलावाच्या भूमिपूजन झाल्याशिवाय मोरेवाडीत येणार नाही हा शब्द मी पूर्ण केला : आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

मोरेवाडी साठवण तलावासाठी मी गेल्या दहा वर्षापासून प्रयत्न करत असून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मी एकट्याने प्रयत्न केला आणि प्रमाणपत्र मिळवल्यानंतर गेल्या दहा वर्षातील दोन लोकप्रतिनिधींनी याविषयी एक कागद हलवलेला नाही. त्यामुळे मी साठवण तलावाचे भूमिपूजन करण्यासाठीच गावात येईल


▶▶ उर्वरित पान २ वर



## प्रतिक कांबळे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड शहर अध्यक्षपदी नियुक्ती!

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने पत्रकार संघ अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतजी मुंडे आणि राज्य समन्वयक संतोषजी मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या बीड जिल्हा पत्रकार संघाच्या बीड



शहर अध्यक्षपदी प्रतिक कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली असून

▶▶ उर्वरित पान २ वर

## अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील इष्टांक वाढीसंदर्भात धनंजय मुंडे यांनी घेतला जिल्हानिहाय आढावा



**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई (प्रतिनिधी) - राज्य विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारपासून मुंबई येथे होणार असून या पार्श्वभूमीवर आज राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी मंत्रालयात विभागाचा जिल्हा निहाय आढावा घेतला.

अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील विविध जिल्ह्यात इष्टांक वाढवणे, ई पॉस मशीन सह सर्व अन्य समस्या याबाबत प्रत्येक जिल्ह्याच्या पुरवठा अधिकारी व अन्य अधिकाऱ्यांकडून माहिती घेत धनंजय मुंडे यांनी संबंधितांना योग्य त्या सूचना केल्या. विविध जिल्ह्यांमधील लोकप्रतिनिधींनी मागणी केल्याप्रमाणे तसेच ज्या

▶▶ उर्वरित पान २ वर

### आजारी पण कामावर

**धनंजय मुंडे यांच्या दोन्ही डोळ्यांचे नुकतेच ऑपरेशन झाले असून त्यांना बेल्स पाल्सी या आजाराचे निदानही झाले होते. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याने काही दिवस विश्रांती घेतल्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा आपल्या कामास त्यांनी सुरुवात केली आहे. डोळ्यांची हालचाल आणि अधिक काळजी म्हणून त्यांनी गॉगलचा वापर करत मीटिंग घेतली. अद्यापही स्पष्टपणे सलग बोलण्यास त्रास होत असतानाही त्यांनी आपल्या कामकाजास आता सुरुवात केली आहे.**

# महाराष्ट्रातील १३ बड्या पोलीस अधिकाऱ्यांच्या तडाफडकी बदल्या; पोलीस दलात खळबळ

**मुंबई । प्रतिनिधी**

पुण्याच्या स्वारगेट स्थानकात शिवशाही बसमध्ये तरुणीवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पुण्यात घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. राज्यात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ झाली आहे. अशात आता पोलीस



यंत्रणेत मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील १३ बड्या पोलिस अधिकाऱ्यांच्या तडाफडकी बदल्या करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक (एसपी), उपायुक्त दर्जाचे अधिकारी आणि आयपीएस पदावरील पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. गृहखात्याने पोलि अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश काढले आहेत. या बदल्यांमुळे गृह खात्यात खळबळ उडाली आहे.

बदली झालेल्या पोलिस अधिकाऱ्यांची यादी- यशस्वी यादव - अपर पोलीस महासंचालक, सायबर, महाराष्ट्र, सुहास वारके - अपर पोलीस महासंचालक, कारागृह व सेवासुधार, अश्वती दोर्जे - अपर पोलीस

▶▶ उर्वरित पान २ वर

## आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त एमटीडीसीकडून महिला पर्यटकांसाठी ५0 टक्के सवलत

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे (MTDC) आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून राज्यातील महिला पर्यटकांसाठी १ ते ८ मार्च २०२५ या कालावधीत एमटीडीसीच्या पर्यटक निवासांमध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. या सवलतीसह विविध पर्यटन उपक्रम देखील राबविण्यात येणार आहेत. आई महिला केंद्रित/लिंग समावेशक पर्यटन धोरणांतर्गत हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

पर्यटन मंत्री श्री. देसाई म्हणाले की, एमटीडीसीने महिलांसाठी समर्पित 'आई' हे महिला केंद्रित पर्यटन

▶▶ उर्वरित पान २ वर







CMYK

# ICU अर्थात् ... 'I see You

**मी पणा अंगात असेल तर कुठल्याही हॉस्पिटलचा आय.सी.यु. कक्ष बघावा. जगात सर्वात आश्चर्यकारक जागा जर कोणती असेल तर ती म्हणजे आय.सी.यु. !!**



दोन व्यक्तींमध्ये भेद निर्माण करणारी कोणतीच रेषा इथे नसते. तुमचा धर्म, जात, वर्ण, श्रीमंत, गरीब, वय, तुमचं प्रोफेशन, राज्य किंवा राष्ट्र ..... एवढंच नाही तर स्त्री-पुरुष हा लिंगभेदही इथं नसतो !!

तो काचेचा दरवाजा ओलांडून आय.सी.यु. मध्ये आलात की हे सगळे भेद जिथे चपला सोडता तिथेच गळून पडतात... आत जाते ते फक्त शरीर ...!!!

आयुष्याचा अर्थ उलगडून सांगणारी लाखो पुस्तकं, ग्रंथ असतील किंवा जगावं कसं हे शिकवणारे असंख्य गुरू सुध्दा असतील... पण जो जीवनाचा अर्थ, जे तत्वज्ञान इथं आय.सी.यु. मध्ये मिळतं.... ते कुठेच शिकायला मिळत नाही !! आयुष्याचा खरा अर्थ येथेच कळतो !!

म्हणूनच ही जागा खरोखरच फार सुंदर आहे....

एखाद्या घरात भुताटकी असते, कोणीतरी कधीतरी तिथं मेलेलं असतं, लोकांना तिथे भीती वाटते. कुठेतरी रस्त्यावर, मोठ्या झाडाखाली अशाच अफवा असतात, भीती असते. पण इथं... इथं आय.सी.यु. च्या एकेका बेडवर आजवर शंभर, दोनशे... असंख्य लोक मेलेले असतात !! कसली भीती नाही, काही अफवा नाहीत. माणूस गेला, बेडशीट बदललं, दुसरा माणूस आला... एवढं सोप्पं असतंय इथं !!

हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध... आस्तिक, नास्तिक जे कोणी असतील त्या सगळ्यांच्या फुफ्फुसात एकाच मशिनमधून ऑक्सिजन जातो....

आपण बाहेर बारीक सारीक गोष्टींचा विचार करत असतो. कोणाला काय वाटेल या विचारात असतो. कपडे कसे आहेत, लोक हसतील का माझ्या अवताराला, बोलण्याला, भाषेला... इथं बेडवर त्या कोणत्याच गोष्टीला किंमत नसते. पुरुष असो की स्त्री... लाज वगैरे गोष्टींना तिथं किंमत शून्य असते !

वेळेची खरी किंमतही सर्वात जास्त इथेच कळते. जेव्हा आपल्याला कळतं की आपण हे जग सोडून जाणार आहे तेव्हा एकच गोष्ट डोक्यात असते... फक्त आणखी एक दिवस, एक तास, अजून पाच मिनिटं मिळावी...

बाहेरच्या जगात आपण असंख्य अपेक्षा घेऊन जगत असतो. स्वत: कडून, इतरांकडून... अपेक्षांचा डोंगर घेऊन चालत असतात. घर, गाडी, शिक्षण, नोकरी, प्रेम, व्यवसाय, नातेवाईक, पैसा... असंख्य अपेक्षा !

तिथे फक्त एकच अपेक्षा असते... अजून एकदा.... फक्त एकदा... डोळे उघडावेत.... !!!!

आयुष्यात कधी वाटलंच की मी फार मोठा आहे तर अशा ठिकाणी जाऊन यायचं... घमेंड उतरते !

कधी वाटलंच की, माझ्याकडे काहीच नाही, सगळं संपलं आहे... तेव्हाही जायचं... आपल्याला कळतं की आपल्याकडे काय आहे !*

निसर्गाने माणूस निर्माण करतेवेळी जो उद्देश समोर ठेवला असेल त्या स्वरूपातील ' माणूस ' मला तिथे दिसतो... अर्थात... I See You जसा आहे तसा !

आयुष्यभर ज्या नावासाठी आपण जगतो ते नाव तीथे पेशंट नंबर असते. एका आयुष्याचा आलेख तीथे पहुडलेला असतो. कर्माचा सिद्धांत तेव्हा कळतो. ज्याचे जैसे कर्म तैसे फळ देतो तो ईश्वर! सगळे जग सोडून जातात असे नाही पण परमेश्वर ही जाणीव करून देत असतो की आता तरी सुधार. उरल्या सुरल्या आयुष्याला सावर. त्या बेडवर प्रथम आपल्याला परमेश्वर आठवतो I See You परमेश्वराचं अस्तित्व जाणवतं. तो सतत सोबतच असतो पण आपण त्याला कधीच आठवत नाही. मग त्या शेवटच्या क्षणी त्याला काय काय मागावं असं वाटत रहातं. त्या साक्षीभावात असलेल्या परमेश्वराने आजतरी आपल्या आयुष्यात सक्रिय व्हावं अशी इच्छा मनात येते.

जो मला आयुष्यभर साथ देतो, माझ्यासाठी चांगलं काय वाईट काय हे ठरवतो, माझ्या आयुष्याची दिशा ठरवतो, त्याला मी कधीच आठवत नाही, त्याचीच गरज मला असते हे जेव्हा कळतं तेव्हा I can understand (ICU) his importance in my life. म्हणून एकदा धडधाकट असताना खउण मध्ये जाऊन या. ते अगतिक चेहरे, ती केविलवाणी धडपड, ती अस्वस्थता, ती उद्विग्नता, ती भिती हे सगळं अनुभवा मग उमगेल आयुष्य, आणि आयुष्यातलं परमेश्वराचं महत्त्व. फार काही कष्ट करून परमेश्वर प्राप्ती करण्याची गरजच नाही. जमेल तसं आणि जमेल तेव्हा त्याचं नामस्मरण करायचं आणि त्याच्याशी मनापासून संवाद करायचा. नुसत्या नामस्मरणाने संतुष्ट होणारा हा परमेश्वर I care you या भूमिकेत येऊन मग आपली संपूर्ण काळजी घेतो.

पान १ वरून पुढे...

## 'अण्णा बोलते अन्...

आणि तो गोत्यात आला. खंडणीचा गुन्हा दाखल होताच कराड फरार झाला होता. बीडचे पोलीस, सीआयडी कराडच्या मागावर होती. पण, कराड काय हाती लागत नव्हता. काही दिवसानंतर कराड स्वत: सीआयडीच्या स्वाधीन झाला. सध्या कराड तुरूंगात आहे. मात्र, तुरूंगातही कराडचा दबदबा असल्याचे समोर आले आहे. तुरूंगात कराडला 'व्हीआयपी' सेवा पुरवली जात आहे. यात काही पोलीस अधिकाऱ्यांचा सुद्धा हात आहे. पोलिसांच्या एका अहवालात वेळ, तारखेसह कराडला कशी, कोणती सुविधा मिळाली, याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यासह तुरूंगात कराडला मदत करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नावे देखील समोर आली आहे. ही माहिती समोर आल्यानतंर एकच खळबळ उडाली आहे. यासंदर्भात देशमुख कुटुंब तुरूंग प्रशासनाकडे माहितीच्या अधिकारात संपूर्ण माहिती मागविणार आहे. समोर आलेल्या 'व्हीआयपी' सेवेसंदर्भात कारागृह अधीक्षक मुलाणी यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

## बीडमध्ये ड्युटी...

दिसून आलंय. या हत्या प्रकरणातील आरोपींसोबत पोलिस उपनिरीक्षक राजेश पाटील याच्यासह काही पोलिसांचे व्यवहारिक संबंध असल्याचं दिसून आलं. भाजपचे आमदार सुरेश धसांनीही अनेक पोलिसांवर आरोप करत त्यांची चौकशी व्हावी अशी मागणी केली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरण, लोकसभा, विधानसभा निवडणुकीमुळे वाढलेला जातिवाद, त्यातून होणारे आरोप प्रत्यारोप यामुळे बीड जिल्हाच नको असे काही अधिकारी खासगीत सांगत आहेत. त्यातच आयपीएस अधिकारी नवनीत कावत यांची पोलिस अधीक्षकपदी नियुक्ती झाल्यानंतरही अनेक अधिकाऱ्यांनी त्याचा धसका घेतल्याची चर्चा आहे. जिल्ह्यातील तब्बल १०७ पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बीडबाहेर बदलीसाठी विनंती अर्ज केल्यानंतर आता राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस त्यावर काय निर्णय घेणार हे पाहावं लागणार आहे.

पोलिसांना पूर्ण नावाऐवजी आता पहिल्या नावाचीच नेमप्लेट- बीडच्या पोलिस दलात एक मोठा बदल करण्यात आला आहे. पोलिसांच्या पूर्ण नावाऐवजी आता केवळ पहिल्या नावाची नेमप्लेट असणार आहे. पोलीस दलातील जातिवाद नष्ट करण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी संकल्पना समोर आणली आहे. १ मार्चपासून याची अंमलबजावणी केली जाणार आहे. बीड पोलिसांची डागाळलेली प्रतिमा सुधारण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांचा प्रयत्न सुरू आहे. बीडच्या पोलिस दलात आडनावाऐवजी पहिल्या नावाने बोलावण्याचा आदेश काढला होता. आता एक पाऊल पुढे टाकत प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्यांच्या टेबलवर पहिल्या नावाची नेमप्लेट असणार आहे. याची अंमलबजावणी १ मार्च पासून केली जाणार आहे. गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यातील जातिवाद समोर आला. पोलीस दलात देखील हा जातीवाद असल्याचा आरोप वारंवार केला जातोय. सरपंच देशमुख हत्या प्रकरणानंतर पोलिसांची प्रतिमा डागाळली. हीच प्रतिमा सुधारण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कावत हे पावलं उचलत आहेत.

## मोरेवाडी साठवण तलावाच्या....

असा मोरेवाडीकरांना दिलेला शब्द आज पूर्ण करत आहे.या साठवण तलावाच्या भूमिपूजनासाठी मोरेवाडी येथे आलो आहे.या तलावामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.ते मृद व जलसंधारण विभाग बीड यांच्या अंतर्गत आष्टी तालुक्यातील मोरेवाडी साठवण तलाव भूमिपूजन समारंभ प्रसंगी ते मार्गदर्शन करताना बोलत होते. लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते साठवण तलाव कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

आ.धस बोलताना पुढे म्हणाले की,२०१४ पासून या तलावाच्या कामासाठी आपण होतो.त्याच काळात पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र मिळाले.मात्र हे काम गेल्या दहा वर्षांपासून प्रलंबित होते. या दहा वर्षाच्या कालावधी नंतर आज प्रत्यक्षात या तलावाचे काम सुरू होत आहे.याचा मनस्वी आनंद होत आहे. या तलावामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.मोरेवाडी ग्रामस्थांची अनेक दिवसापासूनची ही मागणी होती मागील दहा वर्षांमध्ये या कामात कोणतीही प्रगती झालेली नाही.मोरेवाडीला या तलावाच्या भूमिपूजनाच्या अगोदर येणार नाही असे आपण ठरवले होते. अखेर मोरेवाडी साठवण तलावाचे आज भूमिपूजन करण्यात आले आहे.साठवण तलावाने मोरेवाडी ग्रामस्थांच्या अनेक दिवसांचा प्रश्न मार्गी लागणार असून यातून शेतकऱ्यांच्या जीवनात या प्रकल्पामुळे संजीवनी ठरणार हा प्रकल्पातून शेतकऱ्यांचे जीवमान उंचावण्याचे काम या प्रकल्पामुळे होणार आहे.या साठवण तलाव ७ कोटी ६९.६७ लक्ष रुपये खर्च करून या साठवण तलाव तयार होणार होणार आहे.शेतकऱ्यांचा भुसंपादनाचा देखील प्रश्न मार्गी लागणार आहे. यावेळी मोरेवाडी, शेलारवाडी,केरुळ किनी या गावात या गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह.भ.प. संतोष महाराज मोरे,ह.भ.प.लाड महाराज,ज्येष्ठ पत्रकार प्रफुलभाऊ सहस्रबुद्धे, रामहरी महारनोर,अशोक ढवण,सुनील सूर्यवंशी, सरपंच संजय थोरवे, सरपंच अंकुश गीते, शिवाजी अनारसे, कल्याण काकडे, सुंदरलाल गर्जे, भाऊसाहेब गोंदकर, संजय पवार,नामदेव काकडे, महादेव मोरे, जाकीर शेख, झाकीर शेख,संजय निंबाळकर,पप्पू बांदल,उपसरपंच सय्यद,माऊली फंड, ज्युनिअर इंजि.मुंडे साहेब आदी उपस्थित होते.

## प्रतिक कांबळे ...

जिल्ह्यातील सर्व शहर अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी त्यांना प्रभारी करण्यात आले आहे. प्रतिक कांबळे हे बीड पत्रकारितेमध्ये नवनिर्वाचित पत्रकार असून त्यांनी आपल्या प्रगल्भ लेखिनेने अल्पवाधीतच वाचकांना आकर्षित केले आहे. याबरोबरच प्रतिक कांबळे हे बीडच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने गाजलेले व्यक्तिमत्व आहे. याच सर्व बाबींचा विचार करून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतजी मुंडे आणि राज्य समन्वयक संतोषजी मानूरकर यांनी प्रतिक कांबळे यांच्यावर मोठ्या विश्वासाने बीड जिल्हा पत्रकार संघाच्या बीड शहर अध्यक्ष पदाची जिम्मेदारी सोपवली आहे. एवढेच नाहीतर त्यांना जिल्ह्यातील सर्व शहर अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी प्रभारी केले आहे. याबद्दल प्रतिक कांबळे यांचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्यावतीने अभिनंदन करण्यात आले आहे. याबरोबरच प्रतिक कांबळे यांच्यावर बीडच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातून अभिनंदन शुभेच्छांचा वर्षाव होतो आहे.

## अंत्योदय व प्राधान्य...

जिल्ह्याने इष्टांक पूर्ती केली आहे त्यांना वाढीव मागणी असल्यास इष्टांक देण्यासंदर्भात तसेच ईष्टाकाची पूर्ती न केलेल्या जिल्ह्यातील उर्वरित इष्टांक हा अन्य आवश्यकता असलेल्या ठिकाणी हस्तांतरित करण्याबाबत धनंजय मुंडे यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. बुलढाणा जिल्ह्यात रेशनचे धान्य व त्यामुळे केस गळती होत असल्याबाबतच्या काही तक्रारी आल्या असून त्याबाबत धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली व योग्य त्या सूचना केल्या. या बैठकीस विभागाच्या सहसचिव, उपसचिव यांसह सर्व जिल्ह्यांचे जिल्हा पुरवठा अधिकारी आदी दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील १३ बड्या...

महासंचालक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, छेरिंग दोर्जे - अपर पोलीस महासंचालक (विशेष अभियान), के. एम. मल्लिकार्जून प्रसन्ना - अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), राजीव जैन - विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, अभिषेक त्रिमुखे - अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, बृहन्मुंबई, श्रेणिक लोढा - अपर पोलीस अधीक्षक, खामगाव, बुलढाणा, मनोज कुमार शर्मा - विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा सुव्यवस्था), आर. बी. डहाळे - विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अभिलेख केंद्र, अशोक मोराळे - विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, निखिल गुप्ता - अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), सुरेश मेखला - अपर पोलीस महासंचालक. आर्थिक गुन्हे

## आंतरराष्ट्रीय महिला....

धोरण अंमलात आणले आहे. महिला पर्यटकांसाठी प्रवास अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि संस्मरणीय करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. २०२४ मध्ये एमटीडीसीच्या महिला दिन विशेष सवलतीला भरघोस प्रतिसाद मिळाला होता. १५०० हून अधिक महिला पर्यटकांनी या योजनेचा लाभ घेतला. यामुळे सकारात्मक प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर, २०२५ मध्येही ही योजना राबवण्यात येणार आहे.महिला पर्यटक.ींवल. ले या संकेतस्थळावर जाऊन सवलतीचा लाभ घेऊ शकतात.

राज्यमंत्री इंद्रनील नाईक म्हणाले की, पर्यटन क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढावा यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. महिला पर्यटकांसाठी हा विशेष उपक्रम आहे एमटीडीसीची नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि खारघर (नवी मुंबई) येथील महिला-संचालित पर्यटक निवास पूर्णतः महिलांद्वारे संचलित केली जातात. यामध्ये रिसॉर्ट व्यवस्थापन, सुरक्षा, टॅक्सी सेवा, स्वच्छता, हॉटेलिंग आदी सर्व जबाबदाऱ्या महिलांकडेच आहेत. यामुळे महिलांना पर्यटन क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

१ ते ८ मार्च २०२५ आणि वर्षभरातील इतर २२ दिवस असे एकूण ३० दिवस ५० टक्के सवलत असून या २२ दिवसांची माहिती एमटीडीसीच्या संकेतस्थळावर जाहीर केली जाणार. एमटीडीसी च्या पर्यटन स्थळांवर महिला बचत गटांसाठी स्टॉल्सची सुविधा दिली जाईल.

पान ४ वरून पुढे...

## जिल्हास्तरीय व उपविभागीय....

जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी असणाऱ्या ७ जणांना पुणे येथे नेण्यात आले होते.त्यात आमचा समावेश होता. मात्र पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे आम्ही अडचणीत आलो असुन जिल्हा प्रशासन व न्यायालयात दाद मागत आहोत. आम्हाला न्याय कधी मिळणार ?

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समित्यांची स्थापना केलेली आहे. या समित्यांना पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे तसेच पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे पवन ऊर्जा प्रकल्प बाबत समितीकडे आलेल्या तक्रारीची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे. आणि जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पाचे अनुषंगाने उद्धवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे. त्याचप्रमाणे शेतजमीन मालक ,शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासात यांच्यामध्ये समन्वय ठेवणे. प्रकल्प उभारणीसाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावर सर्व प्रकारचे सहकारी सहाय्य करणे इत्यादी अधिकार त्यांना दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि पोलीस अधीक्षक हे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे तालुका स्तरावर सनियंत्रण समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष तर तहसीलदार समन्वयक अथवा सचिव आहेत .मात्र या समित्या केवळ कागदावर असून पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. असे असतानाच पोलीस अधीक्षक बीड यांनी पवनचक्की व सौर ऊर्जा प्रकल्प अधिकाऱ्यांची पाठराखण करणे म्हणजे एक प्रकारे त्यांच्या मनमानी कारभाराला दिलेले सूट असून पिडीत शेतकऱ्यांना न्याय कोण देणार? पीडित शेतकऱ्यांचे तक्रारी कोण ऐकणार ? असा सर्वात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

## लोकमान्य टिळक...

उत्तरेकडील सातपुडा पर्वतरांगापासून ते कावेरीच्या पश्चिमेकडील प्रांतापर्यंत उत्तरेस दमन पासून दक्षिणेकडे गोव्यापर्यंत मराठीचा विस्तार झाला आपल्या देशाच्या दक्षिण भागात मराठी भाषा विकसित झाली. मराठी भाषेतल्या पहिल्या श्रवण बेळगोळ येथील शिलालेख आजही आम्हाला प्रेरणा देतो आहे. शके १११० मध्ये 'विवेकसिंधू 'हा मराठीतील पहिला मुकुंदराज यांनी लिहिलेला ग्रंथ संत ज्ञानेश्वरांनी' 'परी अमृता तेही पैजा जिंके ऐसी अक्षरेची रसिके मेळविन 'अशा शब्दात मराठीचा गौरव करून त्यांनी मराठी भाषेचे महत्त्व स्पष्ट केले. महानुभव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामींनी लिहिलेल्या ग्रंथातील दृष्टांतावरून मराठीची गतिमानता, सहज सौंदर्य, नादमाधुर्य गोडवा दिसून येतो. आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा मिळालेला दर्जा हा ऐतिहासिक क्षण असल्याचे सांगून त्यांनी कुसुमाग्रजांच्या साहित्य क्षेत्रातील, सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाचा मागोवा घेतला यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ अशोक खेत्री यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा रामहरी मायकर यांनी मानले हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. के .एम .पवार यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. यावेळी विद्यार्थी ,विद्यार्थिनी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय अध्यापक...

केले. त्यावेळी जि.प.कें, प्राशा., कन्याशाळा तसेच जि.पमा.सा., नेकनूर येथील शालेय विद्यार्थ्यांना ओमेत्रित करून त्याना या प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. नावीन्यपूर्ण अशा तीन प्रयोगांना पारितोषिके देण्यात आली. ल्यात १) सबा पठाण - प्रथम क्रमांक २) सय्यद अलमास जुबेर -द्वितीय क्रमांक ३) दीक्षा सर्वज्ञ - तृतीय क्रमांक यांना गौरविण्यात आले. याप्रसंगी विज्ञान मंडळ कार्यकारिणी जाहीर कण्यात आली व सन्मान करण्यात आला.

## मनसेचे नगरपालिके...

आंदोलनाची पूर्व सूचना देऊनही मुख्याधिकारी नीता अंधारे या नगरपालिकेत आल्या नसल्याने महिला आंदोलन चांगल्या संत आपल्या होत्या. भ्रष्ट प्रशासनाचे करायचे काय खाली मुंडके वर पाय म्हणत अधिकारी नीता अंधारे यांच्या निषेधार्थ घोषणा देण्यात आल्या. यावेळी महिलांनी डोक्यावर मटकी ठेवत नगरपालिके प्रशासनाचा निषेध केला. आंदोलकांचे निवेदन स्वीकारण्यासाठी बीड नगरपालिकेचे कार्यकारी अभियंता कदम यांनी निवेदन स्वीकारत सर्व मागण्या लवकरच पूर्ण करण्याचे प्रशासनाकडून वचन दिले. या आंदोलनामध्ये महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वर्षाताई जगदाळे यांच्यासह जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव बिडवे शहराध्यक्ष अमरजान पठाण महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष कल्पना कवठेकर ,आशा कुटे, नीता अडागळे, यांच्यासह महाराष्ट्र निर्माण सेनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## सोलर पोल हायमस्ट...

वस्त्यामध्ये सोलर पोल हायमास्ट दिवे बसविण्यासाठी १ कोटी उपायाची मान्यता देण्यात आली आहे. या दोन्ही योजनेत अधिकाऱ्यांच्या संगनमताने ज्या मध्ये न.प. अभियंता उदय ई पिल्ले व मा.मुख्याधिकारी न.प.बीड यांच्या मोहीनीराज - कन्ट्रक्शन व संदिप इलेक्ट्रिकल यांच्या मार्फत दलितवस्ती योजने मधून कामे करुयात येत असून नगरोत्थान महाअभियान मार्फत साबेर कन्ट्रक्शन पाटोदा यांच्या कडून सोलर पोल हायमास्ट दिवे बसविण्याची कामे करण्यत येत आहेत. दोन्ही योजनेतील कामात बसवण्यात आलेल्या पोलची अंदाजित रक्कम व प्रत्यक्ष बसवण्यात आलेल्या पोलची रक्कम या मध्ये भष्ट्राचार झालेला असून निकृष्ट दर्जाचे साहीत्य संबंधीत एजन्सीकडून वापरून संगनमताने करोडो रुपायाचा भ्रष्टाचार केला आहे. या प्रकरणातील अभियंता, न.प.मुख्याधिकारी व संबंधीत कामे करणाऱ्या कंट्रक्शनची निपक्षपाती पणे चौकशी करून या दोन्ही योजनेची कामे करणाऱ्या कन्ट्रक्शन वर संगनमताने भ्रष्टाचार करीत निकृष्टदर्जाचे साहित्य वापरून शासनाची फसवणूक केल्याबद्दल गुन्हे नोंद करण्यात यावेत. व त्यांची मान्यता रद्द करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे. याप्रसंगी.रिपाईचे शहर सचिव अक्षय कोकाटे, युवा शहराध्यक्ष भैय्यासाहेब मस्के,धम्मा पारवे आदीं उपस्थित होते.

## वैष्णवी महाविद्यालय ...

महाविद्यालयातील मराठी विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. होके कैलास होते. प्रमूख व्याख्यात्यांनी आपल्या भाषणामध्ये मराठी भाषेचे महत्व व मराठीला मिळालेला राजभाषे चा मान याविषयी आपले मत व्यक्त केले. तसेच मराठी भाषा ही आपली मायबोली असून आपण दिवसेंदिवस तिचा वापर कसा कमी करत आहोत याविषयी त्यांनी खंत व्यक्त केली.भाषा टिकली तरच संस्कृती टिकेल. असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन व अभार प्रा. डॉ. सचिन खिस्ते यांनी केले.

## कर्मचाऱ्यांच्या कर्तव्याप्रती...

सभापती मुजीब पठाण, उद्योजक सतीश देशमुख, जयभवानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सह प्रशासन अधिकारी प्रा. काशिनाथ गोगुले, मुख्याध्यापक वसंत राठोड, माजी प्राचार्य डॉ. शौकत पटेल, प्राचार्य भास्कर घाडगे यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देविदास गिरी आणि सुधाकर देशमुख यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना देवीदास गिरी आणि सुधाकर देशमुख म्हणाले की, आदरणीय शिवाजीराव (दादा) पंडित यांच्यामुळे आमच्या जीवनाचे चीज झाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अध्यापना सोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम केले. कर्मचाऱ्यांना आपलेसे करणारा शिवछत्र परिवार कायम आमच्या पाठीशी आहे. यापुढील काळातही शिवछत्र परिवाराशी आम्ही कायम एकनिष्ठ राहू असे भावनिक मनोगत त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी सभापती मुजीब पठाण, विद्यार्थी कु. ज्योती तागड, किशोरी बारगजे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रणजीत बडे यांनी करुन उपस्थितांचे आभार महेंद्र देशमुख यांनी मानले कार्यक्रमाला क्रीडा शिक्षक देविदास गिरी यांच्या सौभाग्यवती रेखा गिरी यांच्यासह संदीप गोसावी, रवी गिरी डॉ. प्रशांत गिरी, श्रीकांत गिरी तसेच ज्येष्ठ शिक्षक सुधाकर देशमुख यांच्या सौभाग्यवती रेखा देशमुख यांच्यासह सुरज देशमुख, शुभम देशमुख यांच्यासह सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# महाराज तुम्ही रामगडाचे महंत आहात माझं नाव देखील बजरंग आहे मी पण प्रभु श्रीरामाचा भक्त आहे : खा.बजरंग सोनवणे

## श्री क्षेत्र रामगड संस्थान हे सर्वसामान्य भक्ताचे आशास्थान आहे : राजेंद्र मस्के



**बीड । प्रतिनिधी**

सौंदाना ता.बीड येथे श्री क्षेत्र रामगडाचा वार्षिक सप्ताहाची सांगता महंत श्री स्वामी योगीराज महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने संपन्न झाली, यावेळी बीड जिल्ह्याचे खा. बजरंग बप्पा सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के उपस्थित होते.

या सप्ताहासाठी सौंदाना परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी गावकऱ्यांसोबत संवाद साधताना म्हणाले की मी या गावांच्या व परिसरातील नागरिकांच्या आशीर्वादाने मी बीड चा खासदार झालो आहे.बीडच्या जनतेने मला खूप प्रेम दिलं आता माझी परीक्षा आहे, मतदार सर्वसामान्य व नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी रात्रीचे दिवस करणारा पण सामान्य माणसावर अन्याय होऊ देणार नाही. मी पण महाराज रामाचा भक्त बजरंग आहे. त्यामुळे मी कोणालाच घाबरत नाही असे उद्गार बजरंग सोनवणे यांनी काढले. यावेळी राजेंद्र मस्के असे म्हणाले की श्री क्षेत्र रामगड हे संस्थान सर्वसामान्य भक्ताचे आशास्थान आहे, महंत श्री योगीराज महाराज यांच्या नेतृत्वात खाली गडाचा विकास होत आहे. भक्तांचे देखील योगदान मोठ्या प्रमाणात आहे जो भक्त रामगडाची निष्ठा ठेवतो त्याला कधीच काही कमी पडत नाही. असे मत जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले. यावेळी पिंटू ठोंबरे, दुशंत डोंगरे ,परमेश्वर तळेकर, कथले सर,संपत कुटुळे सह या परिसरातील सरपंच उपसरपंच गावकरी,महिला भगिनी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड जिल्ह्यात भ्रष्टाचाराची परिशीमा गाठलेल्या जि.प. माध्यमिक शिक्षण विभागाचा सावळा गोंधळ कधी थांबणार: प्रा. सत्येंद्र पाटील

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी श्री नागनाथ शिंदे हे मागील काही दिवसापासून शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे फिरकत नसल्या मुळे सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या फाईल्सवर सह्या झाल्या नाहीत. त्यामुळे या सर्व सेवानिवृत शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव कार्यालयातच धुळखात पडले आहे. केवळ शिक्षणाधिकारी श्री शिंदे यांची स्वाक्षरी न झाल्याने सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची नामुष्की ओढवली जाऊ शकते. तेंव्हा शिक्षणाधिकारी श्री शिंदे यांनी मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात शिक्षकांच्या असणारे सर्व प्रश्न आणि सेवानिवृत्त होत असलेल्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित राहिलेले सेवानिवृत्तीचे प्रस्ताव तातडीने मार्गी लावावे अन्यथा शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिक्षक नेते श्री. सत्येंद्र पाटील सर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिला आहे.

## आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींचा शेतकरी संघटनेच्या वतीने सन्मान सोहळा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

१९ मार्च १९८६ रोजी साहेबराव करपे पाटील आणि मालती करपे यांनी मुलाबाळांसह सामूहिक आत्महत्या केली. शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी यांनी सरकार दरबारी या आत्महत्येची शेतकरी आत्महत्या म्हणून नोंद करण्यास भाग पाडले. किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने मागिल सुमारे सहा वर्षांपासून १९




मार्च 'शेतकरी सहवेदना दिवस' म्हणून पाळण्यात येतो.यादिवशी म्हणजेच दि.१९ मार्च २०२५ रोजी दुपारी १२ वाजता अंबाजोगाई जि.बीड येथील मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात शेतकरी संघटनेच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींचा सन्मान सोहळा आयोजित केला आहे. अशी माहिती शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष आणि भारतीय किसान संघ-परिसंघ नवी दिल्लीचे सचिव कालिदास आपेट यांनी दिली.

# बीड जिल्ह्याची बदनामी थांबवण्यासाठी वकील मंडळीने पुढाकार घ्यावा : न्यायमूर्ती संतोष चपळगावकर

## बीड जिल्हा वकील संघाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा शानदार शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा हा गुणवंतांचा जिल्हा आहे. या जिल्ह्याने कलाक्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात, क्रीडा क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात, प्रशासकीय पातळीवर तसेच न्यायिक क्षेत्रामध्ये एवढेच नव्हे सर्वच क्षेत्रामध्ये यशस्वी गरुड झेप घेतलेली आहे. स्नेहभाव जपणारा जातीय सलोखा जोपासणाऱ्या या बीड जिल्ह्याला जर कोणी बदनाम करत असेल तर हे थांबवण्याची जबाबदारी प्रत्येक बीडच्या भूमिपुत्राची आहे. बिघडलेले हे वातावरण पुन्हा एकदा चांगले करण्यासाठी प्रामुख्याने आता वकील मंडळींनी पुढाकार घ्यावा असे भावनिक आवाहन बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र



मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती संतोषजी चपळगावकर यांनी बीड जिल्हा वकील संघाच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात केले.

बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे बीड जिल्हा वकील संघाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मंगळवार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती संतोष चपळगावकर यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलाने झाले. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री आनंद यावलकर साहेब तसेच प्रथम जिल्हा न्यायाधीश सुरेखा पाटील मॅडम यांच्यासह बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अँड रोहिदास येवले, सचिव अँड सय्यद यासेर पटेल यांची प्रमुख उपस्थिती व्यासपीठावर होती.

या कार्यक्रमासाठी सर्व न्यायिक न्यायमूर्ती, ज्येष्ठ विधीज्ञ, वकील बांधव, भगिनी त्याचबरोबर वकील संघाचे उपाध्यक्ष अँड अविनाश गडगे, अँड नितीन वाघमारे, सहसचिव अँड श्रीकांत जाधव, कोषाध्यक्ष अँड धनंजय गिराम, ग्रंथपाल सचिव अँड भीमा जगताप, महिला प्रतिनिधी अँड छाया वाघमारे यांच्यासह वकील संघाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आमदार संदीप क्षीरसागर आणि आमदार विजयसिंह पंडित यांनी वकील संघाला दिले एक लक्ष रुपयाची पुस्तके

**बीड विधानसभेचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी ५० हजार रुपयांची विविध न्यायिक पुस्तके आणि गेवराई विधानसभेचे आमदार विजयसिंह पंडित यांनी देखील ५० हजार रुपयांची न्यायिक पुस्तके बीड जिल्हा वकील संघास भेट म्हणून दिली. आमदारांच्या वतीने अँड दीपक कुलकर्णी आणि अँड आनंद पाटील यांनी प्रतिनिधिक स्वरूपात ही पुस्तके न्यायमूर्तींच्या साक्षीने व्यासपीठावर बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अँड रोहिदास येवले यांच्याकडे सुपूर्द केले.**

# पाण्यासाठी नागरिकाचा व महिलांचा तलवाडा ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा

## जोपर्यंत नागरिकांना पाणी मिळत नाही तोपर्यंत माघार हटणार नाहीत ; अंबिकानगर येथील पाणी पुरवठा दीड महिन्यापासून बंद ; योजनाचा निधी हडप

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे उन्हाळा सुरू होताच तलवाडा कराना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून पंधरा ते वीस दिवसाला येणारे पाणी महिना महिना येत नसल्याने महिला आणि नागरिक चांगले संतापले आहेत यासाठी २२ फेब्रुवारी रोजी महिला हंडे घेवून ग्रामपंचायत कार्यालय समोर ठिय्या मांडून बसल्या होत्या यावेळी दोन तीन दिवसात पाणी पुरवठा सुरळीत करण्यात येईल असे ग्रामपंचायत प्रशासना तर्फे सांगण्यात आले होते परंतु अद्याप ही पाणी आले नसल्याने पुन्हा ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे याबाबत चे लेखी निवेदन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर,जयदेव शिंगणे,सुनीता ( भाभी ) गील यांच्या सह महिला आणि नागरिकांनी पंचायत समिती कार्यालय गेवराई याठिकाणी दिले आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तलवाडा



याठिकाणी कोट्यवधी रुपये खर्चून जलस्वराज्य योजना सुरू करण्यात आली होती परंतु नव्याने निवडून आलेले कार्यकारी मंडळ हे योजना राबवण्यात कुचकामी ठरत असून नागरिकांना वेळेवर सुविधा देण्यास निष्क्रिय झाले आहेत. पाणी पुरवठा सुरळीत करण्यात येत नसून जलजिवन योजनेचे काम ही संथ गतीने सुरू आहे.त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत असून पाणी सुरळीत सोडण्यास सांगितले असता उडवा उडविची उत्तरे देतात.महिला,मुली,वयोवृध्द यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने दिनांक २२ फेब्रुवारी शनिवार रोजी काही महिला आक्रमक होऊन ग्रामपंचायत समोर ठिय्या मांडून बसल्या होत्या यावेळी त्यांना काही काळ ताटकळत बसण्याची वेळ आली होती यामध्ये उपसरपंच आक्रम सौदागर यांनी मध्यस्थी करून मार्ग काढू असे आश्र्वासन दिल्या नंतर त्यांनी त्यांच्या शब्दाला मान देत दोन तीन दिवसाचा वेळ दिला होता परंतु सरपंच पती आणि काही हलगर्जी पना करणारे यांच्या मुळे अजून ही पाणी पुरवठा सुरळीत झाला नसून अध्यप पाणी न आल्याने दिनांक १ मार्च रोजी ग्रामपंचायत च्या ढिसाळ कामकाच्या विरोधात हंडा मोर्चा काढण्यात येणार आहे.



*पुणे : रोखठोकचे संपादक श्री गणेशजी हुंबे यांची पुणे जिल्हा पत्रकार संघ सोशल मीडिया जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देऊन सत्कार करतांना पिंपरी चिंचवड चे जिल्हा सरचिटणीस दीपक जाधव छायाचित्रात दिसत आहेत.*


### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता.जि.बीड या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २३५/२०२५, आश्रुबा शामराव गायवळ वि. निरंक**

ज्यापेक्षा **चंपाबाई भ्र. आश्रुबा गायवळ**, हे दिनांक ०८/११/२०२४ रोजी बोरी पो. परभणी (के), ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार- १. आश्रुबा पि. शामराव गायवळ, वय-७८ वर्षे, रा. बोरदेवी (नवाबपूर/पी, परभणी (क) ता. जि.बीड.२ . सुप्रीया भ्र. अमोल गायवळ, वय-३८ वर्षे, रा. बोरदेवी (नवाबपुर) पो. परभणी (के) ता.जि. बीड. ३ .प्रांजल पि. अमोल गायवळ, वय-१६ वर्षे, रा. बोरदेवी (नवाबपूर)पो. परभणी (के), ता.जि. बीड. ४ .अभिनव पि. अमोल गायवळ, वय-१६ वर्षे, रा. बोरदेवी (नवाबपूर)पो. परभणी (के), ता.जि. बीड.

अर्जदार १ हे मयत नामे **चंपाबाई भ्र. आश्रुबा गायवळ,** याचे पत्ती असून, अर्जदार क. २ ही मयताची सुन व अर्जदार क. २ ही नात असुन अर्जदार क. ४ हा मयताचा नातु आहे. तसेच मयताचा मुलगा अमोल पि. आश्रुबा गायवळ हा दिनांक ३०.०८.२०११ रोजी मयत झालेला आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच त्यांना/ अर्जदारांना सदरहू पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, **चंपाबाई भ्र. आश्रुबा गायवळ,** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. **प्रकरणाची पुढील तारीख** ०४/०४/२०२५ आहे. आज दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले. **(अँड असे ए. जी. यांच्यामार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**
**शिक्का**

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एस.पी. वानखडे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६८/२०२५, उर्मिला लक्ष्मण कादे वगैरे विरुद्ध निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **लक्ष्मण पि. उत्तम कादे हे / हया दिनांक १८/०१/२०२५ रोजी रा. खेर्डावाडी ता. गेवराई जि. बीड, येथे मयत झाले/ झाल्या आहेत. अर्जदार क. १. उर्मिला लक्ष्मण कादे वय – ६२ वर्षे, धंदा– शेती,खेर्डावाडी ता. गेवराई जि. बीड २. हरिकृष्ण पि लक्ष्मण कादे वयः ४२ वर्षे, धंदा शेती, खेर्डावाडी ता. गेवराई जि. बीड.** शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता, करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाने प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणा म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर सदर अर्जदारांच्य होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत **लक्ष्मण पि. उत्तम कादे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २५/०२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख २८/०३/२०२५

**(मार्फत ॲड. एस. एल. मेघारे गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**
**शिक्का**

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एस. पी. वानखडे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५५१ / २०२४**
**अनिल दामोधर घोडके व इतर विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे दामोधर पि. अर्जुन घोडके हे / हया दिनांक २६/०९/२००८ रोजी मौजे उमापुर, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार १. अनिल पि दामोधर घोडके, वय – ५२ वर्षे, धंदा–शेती, रा. उमापुर, ता. गेवराई, जि. बीड, २. संभाजी पि. दामोधर घोडके, वय – ४८ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर, ३. काविरा भ्र. सुनिल घोडके, वय–४५ वर्षे, धंदा–घरकाम व शेती, रा. सदर, ४. ऋषिकेश पि. सुनिल घोडके, वय–२३ वर्षे, धंदा–शिक्षण, रा. सदर, ५. हरिओम पि. सुनिल घोडके, वय–२० वर्षे, धंदा–शिक्षण, रा. सदर, ६. मिरा भ्र. संदीप औटे, वय–३० वर्षे, धंदा–घरकाम, रा. नवगांव ता. पैठण जि. छ. संभाजीनगर, ७. भाग्यश्री भ्र. संदीप राऊत, वय–२५ वर्षे, धंदा–घरकाम, रा. कुंभार गल्ली जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर यांना शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हज होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर न्यायालय सदर अर्जदारान्या सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत दामोधर पि. अर्जुन घोडके यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०/१२ /२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख १५/०१/२०२५

**(मार्फत ॲड. एस. एल. मेघारे, गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**
**शिक्का**

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३०१/२०२५, शिवाजी विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. प्रभावती भ्र. लक्ष्मण आनेराव वय ८० वर्षे धंदा घरकाम २. जगदीश लक्ष्मण आनेराव वय ४४ वर्षे धंदा शेती रा. नोकरी दोघे रा. टिळक रोड, बलभीम चौक, बीड ता.जि.बीड

विरुध्द निरंक

**मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र** (Heirship Certificate) **मिळणे बाबत...**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे **लक्ष्मण भगवान आनेराव** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे **लक्ष्मण भगवान आनेराव** रा. टिळक रोड, बलभीम चौक, बीड ता.जि.बीड यांचा मृत्यु दिनांक : २३/०४/२०१५ रोजी झाला. अर्जदार क २ हे अर्जदार क १ यांचे व मयत लक्ष्मण भगवान आनेराव यांचे दत्तक पुत्र आहेत. अर्जदार क्र १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार क २ हा मयताचा मुलगा आहे. मयताचे आई वडील फार पूर्वीच मयत पावले आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत **लक्ष्मण भगवान आनेराव** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २५/०२/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची **पुढील तारीख दिनांक** १७/०४/२०२५.

(अँड. गिराम डी.सी.)

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**
**शिक्का**

# जिल्हास्तरीय व उपविभागीय स्तरीय संनियंत्रण समित्या कागदावर ; पिडीत शेतकऱ्यांना वाली कोण ?

## पोलिस अधिक्षक साहेब सदरक्षणाय कि पवनचक्की रक्षणाय ? ? महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपन्यांकडून खोटा गुन्हा ; गणेश जगदाळे न्यायाच्या प्रतिक्षेत : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांनी सौर ऊर्जा प्रकल्प व पवन ऊर्जा प्रकल्पाच्या काम काजाच्या संबंधाने स्थानिक राजकीय पुढारी, स्थानिक शेतकरी व गावगुंड यांच्याकडून विविध कारणांसाठी होणारी अडवणूक करून कामकाज बंद पाडणे किंवा खंडणीची मागणी करणे या अनुषंगाने प्रकल्पातील अशा होणाऱ्या घटनांना आळा



घालण्यासाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती केली आहे. मात्र पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक व दडपशाही याविरोधात शेतकऱ्यांनी शासन दरबारी लेखी तक्रार करून दाद मागण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर गुन्हे दाखल होतात. जिल्हा प्रशासन त्यांची बाजु मुळात ऐकुनच घेत नाही. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बाबतीत बालाघाटावर अशा घटना घडलेल्या आहेत. यातच बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपन्यांनी खोटा गुन्हा दाखल केला असुन त्यांना न्याय कधी मिळणार ? ? पोलिस प्रशासन पवनचक्की कंपन्यांचीच केवळ पाठराखण करत असुन पिडीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

**सौर ऊर्जा प्लेट टाकणार सांगुन रात्रीतुन पवनचक्की उभारली ; अडवायचा प्रयत्न केला असता गुन्हे दाखल केले : गणेश जगदाळे**

बीड तालुक्यातील म हाजनवाडी येथील शेतकरी गणेश जगदाळे सांगतात आम्ही ७ जण भावंडे एकत्र कुटुंब पद्धतीत असुन आमच्या शेतालगत ९०० फुट अंतरावर फसवणूक करून पवनचक्की उभारण्यात आली आहे. अगोदर आम्हाला सौर ऊर्जा प्रकल्पाच्या प्लेटी लावणार असल्याचे सांगण्यात आले.नंतर रात्रीतुन मोठमोठ्या वाहनातुन पवनचक्की साहित्य आणण्यात आले.आम्ही अडवण्याचा प्रयत्न केला असता आमच्यावर पोलिस प्रशासनाकडून गुन्हे दाखल करण्यात आले. पवनचक्की कंपन्यांच्या कापर तारांमुळे जमिनीतील पाण्याची पातळी घटली. आमच्या शेतात सध्या शंभरच्या वर दुधदुभते जनावरे आहेत. पवनचक्की सुरू झाल्यावर आम्हाला सगळं सोडून जायची पाळी येणार आहे. आम्हाला सन २०१३ मध्ये महाराष्ट्र शासन कृषी व पणन विभाग सन्मानपत्र वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार मिळालेला आहे.गेल्या महिन्यात १३ जानेवारी दरम्यान बीड ▶▶ उर्वरित पान २ वर

## सोमवारी लोकशाही दिन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ३ मार्च २०२५ रोजी सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल.



*पाथरूट समाज बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतिने शिवजयंती निमित्त आयोजित केलेल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यास टॉस व बक्षीस वितरणास उपस्थित राहुन विजेत्या संघातील खेळाडू व आयोजकांना शुभेच्छा दिल्या. बीड शहराजवळ असलेल्या अयोध्या नगर, बहिरवाडी येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेत मोटे इलेव्हन संघाने विजेतपद पटकावले व बहिरवाडीचा संघ उपविजेता ठरला. या स्पर्धेचे पहीले बक्षीस राजयोग फाऊंडेशन च्या वतिने देण्यात आले. यावेळी जितेंद्र बोबडे, भोला जाधव, कुंदन गायकवाड, वैभव जाधव, विवेक गायकवाड, निलेश पवार, राकेश जाधव, योगेश जाधव व प्रेक्षक आणि खेळाडु उपस्थित होते.*

## लोकमान्य टिळक महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन व कुसुमाग्रज जयंती साजरी

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन आणि कुसुमाग्रज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भालचंद्र कुलकर्णी हे होते.यावेळी व्यासपीठावर डॉ. गोविंद पांडव प्रा. गोपीचंद घायतिडक, प्रा. डॉ. अशोक खेत्री डॉ रामहरी मायकर हे उपस्थित होते. प्रारंभी कविवर्य



कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ भालचंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ बी जी कुलकर्णी यांनी मराठी भाषेला जवळपास दोन हजार वर्षांपूर्वीचा इतिहास असल्याचे सांगून ▶▶ उर्वरित पान २ वर

## शासकीय अध्यापक विद्यालय, नेकनूर येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

शासकीय अध्यापक विद्यालय, नेकनूर येथे दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन द्वितीय वर्ष मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी केलेले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अब्दुल नजीव सर होते तर प्रमुख पाहूणे



म्हणून श्रीमती नलावडे मॅडम, प्रा. पुजारी सर होते. कार्यक्रमाला मार्गदर्शन प्रा. धोंडगे सर, पट्टेवाड सर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचलन प्रज्ञा काळे व शेख महेक यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रतिमापूजन करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. धोंडगे सर यांनी केले. त्यानंतर प्रमुख पाहुने प्रा. पुजारी सर, नलावडे मॅडम, प्रा. पट्टेवाड सर यांनी मार्गदर्शन केले. सकाळच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रयोग सादर ▶▶ उर्वरित पान २ वर

## मनसेचे नगरपालिके समोर बोब मारो आंदोलन

### भोंगळ कारभाराचे काढले वाभाडे ! मुख्याधिकारी हटाव ; बीड बचाव च्या घोषणांनी परिसर दणाणले

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेच्या भोंगळ कारभाराचा फटका सर्व सामान्य बीड शहर वासियांना बसत आहे. पाणी साठा मुबलक प्रमाणात असताना वीस दिवस आड पाणी पुरवठा केला जातो. शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत आहे शहरातील बहुतांश भागात पथदिवे बंद असल्याने अंधाराचे



साम्राज्य पसरले आहे तर शहरात मोकाट जनावरांचा मुक्त संचार वाढला आहे. बीड नगर पालिकेने तत्काळ या सर्व मागण्याकडे लक्ष देऊन सोडवण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षातील जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेच्या दारात संबळ आंदोलन करण्यात आले. मुख्याधिकारी हटाव नगरपालिका बचाव, पाणी आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा विजय असो यास राज ठाकरे यांच्या विजयाच्या घोषणा देत महाराष्ट्र निर्माण सेनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते.

▶▶ उर्वरित पान २ वर

## सोलर पोल हायमस्ट दिवे बसवण्यात बीड शहरात मोठा भ्रष्टाचार ; जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार कारवाईची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान महाअभियाने व दलितवस्ती योजनेच्या सोलर पोल हायमास्ट दिवे बसविण्याच्या योजनेत संबंधीताकडून निकृष्ठ दर्जाचे साहीत्य वापरून भष्ट्राचार केला आहे.त्या प्रकरणी बीड नगरपालिका सखोल चौकशी



करून योग्य ती कारवाई करावी या मागणीसाठी रिपाईचे अक्षय कोकाटे यांनी बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे थेट निवेदनाद्वारे तक्रार केली आहे. बीड नगर परिषदेच्यावतीने नगरोत्थान अभियान व दलितवस्ती योजने अंतर्गत सोलार पोल हायमास्ट दिवे बीड शहरातील विविध भागामध्ये बसविण्यासाठी ५ कोटी २५ लाख रु मान्यता देण्यात आली असुन दलित ▶▶ उर्वरित पान २ वर

## वैष्णवी महाविद्यालय मध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

साहेबराव मस्के पाटील शिक्षण प्रसाद मंडळ संचलित व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.छत्रपती संभाजी नगर सलग्नीत वैष्णवी महाविद्यालयामध्ये मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाची विभाग



प्रमुख प्राध्यापक प्रा.आवटे ए.बी उपस्थित होते.तर कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणून ▶▶ उर्वरित पान २ वर

## अपेगावाच्या विज्ञानेश्वराचा महाअभिषेक



**गेवराई । प्रतिनिधी**

पैठण तालुक्यातील भाविकांचे श्रद्धस्थान असलेल्या आपेगावच्या विज्ञानेश्वराच्या म हादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त लाखो भाविकांनी दर्शन घेतले. चिंतेश्वर कलेक्शनचे संभाजी वादे व बंधु कृष्णा वादे यांनी उपस्थित राहून महादेवाचे दर्शन घेतले आणि सहकुटुंब महाअभिषेक केला. विज्ञानेश्वर महादेव मंदिरात पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. मोठी गर्दी केली होती.विज्ञानेश्वर महादेवाच्या मंदिर परिसरात भक्तीचा मळा फुलला होता. मंदिरात सकाळपासूनच विविध गावांमधून पायी दिंड्या, भजन-किर्तनातून महादेवाचा जयघोष करीत दर्शनासाठी येत होत्या. यावेळी महादेवाच्या पिंडीवर अभिषेक, महाआरती, व कीर्तन, रात्री भजन असा संपूर्ण दिवस चा कार्यक्रम समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.






## कर्मचाऱ्यांच्या कर्तव्याप्रती प्रामाणिकपणामुळे संस्था नावारूपाला आली : रणवीर पंडित

### जयभवानीत शिक्षक देवीदास गिरी आणि सुधाकर देशमुख यांचा सेवापुर्ती समारंभ

**गेवराई । प्रतिनिधी**

जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांची मेहनत, कर्तव्यप्रती प्रामाणिकपणा यामुळे संस्था नावारूपाला आली. संस्थेअंतर्गत घेतलेल्या क्रीडा महोत्सवात क्रीडा शिक्षकांनी उत्कृष्ट काम केल्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडू घडू शकले. क्रीडा शिक्षक देविदास गिरी सरांनी देखील आपल्या कार्यकाळात मैदानाशी नाते जोडले आणि त्यामुळे या भागातील मुलांना क्रीडा क्षेत्रात नाव कमविण्यासाठी संधी मिळाली. ज्येष्ठ शिक्षक सुधाकर देशमुख यांनी देखील अध्यापनाबरोबरच संस्थेच्या वेगळ्या वेगवेगळ्या कामात पुढाकार घेतला. या सर्व कर्मचाऱ्यांचे

संस्थेसोबतच शिवछत्र परिवारासी घनिष्ठ नाते आहे, त्यांच्या ऋणात आम्ही कायम आहोत असे प्रतिपादन शारदा स्पोर्ट्स अॅकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित



यांनी केले. जयभवानी विद्यालयातील देवीदास गिरी, जेष्ठ शिक्षक सुधाकर देशमुख यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. शिवाजीनगर गढी येथील जयभवानी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील क्रीडा शिक्षक देविदास गिरी आणि ज्येष्ठ शिक्षक सुधाकर देशमुख हे आज नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला शारदा स्पोर्ट्स अॅकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, बाजार समितीचे ▶▶ उर्वरित पान २ वर